नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २९/१०/२०२६ (गुरूवार)

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत डुमरी पुलाजवळ झालेल्या खाजगी बसच्या अपघातप्रकरणी ब्रिजचे बांधकाम करणाऱ्या कंपनीचे मालक, प्रोजेक्ट डायरेक्टर व साईट इंजिनिअर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक २८/१०/२०२६ रोजी मौजा डुमरी पुलिया, मनसर ते कन्हानकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील फ्लायओव्हर ब्रिजच्या बांधकामालगत खाजगी बसचा गंभीर अपघात झाला. एम एच २७ बी एक्स ६५२१ क्रमांकाची बस बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी सुमारे ४ फूट खोल खड्ड्यात पडल्याने झालेल्या या अपघातात बसचालकाचा मृत्यू झाला असून १० प्रवासी जखमी झाले आहेत.

दिनांक २८/१०/२०२६ रोजी बस क्रमांक एम एच २७ बी एक्स ६५२१ ही बस जबलपुर ही सिवणी मार्गे नागपुर कडे येत असतांना पाहटे ०४/०० वाजेच्या सुमारास मौजा डुमरी पुलिया, मनसर ते कन्हानकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील फ्लायओव्हर ब्रिजच्या बांधकामालगत चालकाच्या ताब्यातील वाहन अनियंत्रित होवुन बस पलटी झाल्याने सुमारे ४ फूट खोल खड्ड्यात पडली. सदर अपघाताची माहीती डायल ११२ वरून कन्हान पोलीसांना प्राप्त झाली. माहिती मिळताच कन्हान पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचले अपघाताची गंभीरता लक्षात घेऊन मदत यंत्रणा तात्काळ बोलवण्यात आल्या. स्थानिक दक्ष नागरिकांच्या मदतीने बस मध्ये अडकलेल्या सर्व प्रवशांना बाहेर काढले. जखमींना तातडीने रुग्णवाहिकेच्या मदतीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्याची व्यवस्था केली. जखमींना पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांत दाखल करण्यात आले. सदर अपघातामध्ये बस चालक सुनील कुमार यादव, वय ४० वर्षे, रा. खुर्शीपार, लखनादौन, जि. सिवनी, मध्य प्रदेश. याचा मृत्यु झाला. १० प्रवासी किरकोळ /गंभीर जखमी झाले आहे.

बस चालकाने अनियंत्रितपणे वाहन चालविल्याने तसेच सदर ठिकाणी फ्लायओव्हर ब्रिजचे बांधकाम सुरू असताना आवश्यक सुरक्षा उपाययोजना, वाहतुकीसाठी सुरक्षित व्यवस्था तसेच सुरक्षेच्या मानकांचे पालन करण्यात आले नसल्याने सदर अपघात झाल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनास आले.

सदर प्रकरणी बस चालक तसेच फ्लायओव्हर ब्रिजचे बांधकाम करणारी ग्रे इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड **कंपनीचे मालक** विनयकुमार आशोककुमार अग्रवाल, रा. व्हिआयपी पुरम कॉलनी, जीत पेट्रोलपंपच्या मागे,ग्वाल्हेर रोड, सेवला जाट, आग्रा, उत्तरप्रदेश, **प्रोजेक्ट डायरेक्टर** भवनीत सिंग, रा. नागपुर व **साईट इंजिनिअर** तरुण कुमार, रा. नागपुर यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन कन्हान येथे भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), १२५(अ), १२५(बी), २८५, २८१, ३(५) सह कलम मोटार वाहन अधिनियमातील कलम १९८अ(२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदर प्रकरणाचा पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहेत

सणोत्सवांच्या काळात ध्वनी व पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांकडून व्यापक जनजागृती

मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हयात नागरिकांमध्ये म्युझीक सिस्टीम, ॲम्लीफायर इतर वादये व फटाक्यांच्या वापरामुळे होणारे ध्वनी व पर्यावरण प्रदूषण याबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली आहे.

सदर जनजागृती कार्यक्रमाध्ये शाळा व महाविद्यालयांमध्ये विशेष सत्रांचे आयोजन करून म्युझीक सिस्टीम, ॲम्लीफायर इतर वादये व फटाक्यांमुळे होणारे वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण यांचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले आहे. तसेच पोलीस पाटील आणि स्थानिक व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. बीट अधिकारी व अंमलदार यांच्यामार्फत गावागावांत, बाजारपेठांमध्ये, गर्दीच्या ठिकाणी तसेच सार्वजनिक ठिकाणी ध्वनी प्रदूषणाबाबत जनजागृती करण्यात आली आहे. यासोबतच नियमांचे पालन करण्याचे आवाहन करणारे संदेश प्रदर्शित करून नागरिकांना ध्वनी प्रदूषणाचे दुष्परिणाम व त्यावरील कायदेशीर तरतुदींची माहिती देण्यात आली.

म्युझीक सिस्टीम, ॲम्लीफायर इतर वादये व फटाक्यांच्या वापरामुळे होणारे ध्वनी व वायू प्रदूषणाचे गंभीर दुष्परिणाम असुन फटाके फोडताना होणारा मोठा आवाज आणि धूर आपल्या, इतरांच्या व पर्यावरणाच्या आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. मोठा आवाज कानाच्या स्नायूंना नुकसान पोहोचवतो व ऐकण्याची क्षमता कमी होऊ शकते. फटाक्यांमधील धुरामुळे श्वासाचे आजार, खोकला, दम लागणे आणि इतर आरोग्य समस्या निर्माण होतात. फटाक्यांमधील रसायनांमुळे हवा, माती आणि पाण्याचे प्रदूषण वाढत तसेच पक्षी व प्राण्यांना याचा त्रास होतो. मोठ्या आवाजामुळे लहान मुलांमध्ये भीती, ताण व मानसिक त्रास निर्माण होतो आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याचा धोका वाढतो.

नागपुर ग्रामीण पोलीसांकडुन आवाहन करण्यात येते की,नागरिकांनी सण–उत्सवांच्या काळात म्युझीक सिस्टीम, ॲम्लीफायर इतर वादये व फटाक्यांचा वापर करताना ध्वनी व पर्यावरण प्रदूषण होणार नाही याची दक्षता घ्यावी. ध्वनी प्रदूषणासंबंधी निर्धारित नियमांचे पालन

करावे व रात्रीच्या शांततेचा भंग होणार नाही याची काळजी घ्यावी. ध्वनी प्रदुषणाबाबत काही तक्रार आल्यास नागरिकांनी तात्काळ नजीकच्या पोलीस स्टेशनला किंवा खाली दिलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर तसेच इमेलवर तक्रार करावी.

ध्वनी प्रदुषणाच्या तक्रारीसाठी १) हेल्पलाईन क्रं — ७०६६११२१००, डायल ११२

२) इमेल आयडी — cronagpurrural@gmail.com




महाराष्ट्र पोलीस
पोलीस ठाणे कन्हान
अंतर्गत
ध्वनी प्रदूषणावावर व्यापक
जनजागृती कार्यक्रम मोहीम






By bickvsofs - Nagpur,Nagpur Division

कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन पाचगाव :— दिनांक २८/१०/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, हळदगाव शिवारात टेकडी वरील जंगलात काही इसम हे कोबडयाची झुज लावुन पैशांची बाजी लावुन पैसे हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पाचगाव पोलीस घटनास्थळी पोहचले असता, हळदगाव शिवारात टेकडी वरील जंगलात काही इसम कोंबडयांच्या पायाला धारदार काती बांधुन त्यांच्यी झुंज लावुन पैशांचा हारजितचा खेळ खेळतांना दिसुन आले. आरोपी क्र. **१) जितेन्द्र गुगारामजी झाडे, वय ४५ वर्ष, रा. उमरेड नारायण नगर २) निनोद मुरलीधर बेले, वय ४० वर्ष, रा. मंगळवारी पेठ उमरेड ३) अमीत ईश्वरलालजी तांबेकर, वय ४४ वर्ष, मंगळवारी पेठ उमरेड ४) कुणाल नामदेव मांढरे, वय १८ वर्ष, रा. हनुमान मंदीर गांगापुर उमरेड ५) स्वप्नील देवीदास मोहीनकर, वय २८ वर्ष, रा. गांगापुर उमरेड ६) शुभम रामचंद्र रामटेके, वय २८ वर्ष, रा. बेलसाखरा उमरेड ७) संदीप दोमाधर वाकोडीकर, वय ४५ वर्ष रा. कावरापेठ उमरेड ८) गौतम संपतराव मेश्राम, वय ५२ वर्ष, रा. उदासा उमरेड ९) विजय प्रदीप गायकवाड, वय ३५ वर्ष, रा. उदासा उमरेड १०) लोकेश विजय निनावे, वय ३८ वर्ष, रा. जोगीठाणा पेठ उमरेड ११) वसंता उरकु डा निकोसे, वय ६० वर्ष, रा. हळदगाव उमरेड १२) अर्शद गिरधर तिवाडे, वय २५ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड** हे घटनास्थळी मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष रोख ४६५०/— रूपये, २) ०५ ॲडरॉईड व ०१ कीपॅड एकुण ०६ मोबाईल किंमती ५१,०००/—रूपये ३) ०७ मोटरसायकल किंमती ३,४०,०००/—रूपये ४) ०८ कोंबडे किंमती ४६५०/—रूपये असा एकुण — ४,००,३००/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. आरोपी क्र. १ ते १२ यांच्यावर पोलीस स्टेशन पाचगाव येथे १२ (ब) म. जु. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अवैध दारू निर्मिती, विक्री तसेच सेवन करणाऱ्यांवर २५ गुन्हे दाखल,

दिनांक २८/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, साठवणूक तसेच वाहतूक, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण २५ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन अरोली येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०३ गुन्हे नोंद.

नमुद कारवाईत एकुण १७१९० मिली देशी दारू, २८ लीटर मोहाफुल दारू असा एकुण १०९६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर